**महाराष्ट्र शासन**

क्रमांक- जिपब-४८१९/प्र.क्र.७१७/आस्था-१४,
ग्राम विकास विभाग,
बांधकाम भवन, पहिला मजला,
मर्झबान रोड,फोर्ट,मुंबई -४०० ००१
दिनांक: १८ जानेवारी,२०२०.

**प्रति,**

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व.

**विषय** : जिल्हा परिषदेतील प्राथमिक शिक्षकांच्या आंतरजिल्हा बदल्या.
**<u>टप्पा क्रमांक-४.</u>**

**संदर्भ** :- शासनाचे क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र..१०७३/आस्था-१४
दि.१७/१२/२०१९, ०१/०१/२०२० व दि.०३/०१/२०२० चे पत्रे.

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भिय पत्रांचे कृपया अवलोकन व्हावे. जिल्हा परिषद शिक्षकांच्या बिंदूनामावली विभागीय आयुक्त (मा.व.क.) कार्यालयाकडून तपासून अद्ययावत करण्यासंदर्भात संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्याअनुषंगाने आपल्या अधिपत्याखालील शिक्षकांची बिंदूनामावली अद्ययावत झालेली आहे अशी शासनाची धारणा आहे. त्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या ट्रान्सफर प्रणालीमधील लॉगिनला रिक्त जागांची नोंद करण्याची सुविधा दि.२०/०१/२०२० ते ३१/०१/२०२० या मुदतीत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

राज्यातील जिल्हा परिषदांमधील सर्व प्राथमिक शिक्षकांची आंतरजिल्हा बदली प्रक्रिया टप्पा क्र.४ दि.१९/०१/२०१९ पासून सुरु करण्यात येत आहे. या प्रक्रियेमध्ये खालील टप्प्यानुसार कार्यवाही केली जाणार आहे.

१) आंतरजिल्हा बदली प्रक्रियेसाठी सर्व जिल्ह्यातील प्राथमिक शिक्षकांकरीता दि.१९/०१/२०२० ते दि.१०/०२/२०२० या कालावधीत ऑनलाईन संगणकीय प्रणालीव्दारे त्यांना अर्ज भरण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

२) सदरच्या बदल्या ह्या पूर्वी निश्चित केलेल्या धोरणानुसार १०% पेक्षा जास्त जागा रिक्त असल्यास त्या जिल्हा परिषदांमधून शिक्षकांना आंतरजिल्हा बदलीने बाहेर जाता येणार नाही. जिल्ह्यातून बाहेर जाण्याकरीता रिक्त पदांची टक्केवारी १०% पेक्षा कमी असणे गरजेचे आहे.

३) सदरची आंतरजिल्हा बदली संबंधीत शिक्षकांच्या नियुक्ती प्रवर्गानुसार बदलीने जाण्याच्या जिल्हा परिषदेत रिक्त पद असल्यास, त्या रिक्त पदावर बदली करण्यात येणार आहे.

४) याअंतर्गत संबंधित शिक्षकांनी आंतरजिल्हा बदलीसाठी मागील वर्षी भरलेले जुने अर्ज Delete करण्यात आलेले असून संबंधित शिक्षकांनी बदलीसाठी अर्ज नव्याने भरण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे.

५) ट्रान्सफर प्रणाली मधील शिक्षकाच्या Login मध्ये स्वत:च्या नोकरीसंबंधी महत्त्वाच्या तारखा, सेवेसंबंधी महत्वाची माहिती तसेच एका शाळेतून दुसऱ्या शाळेत Attach-Detach होणे (Join New School) ही सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. ज्या शिक्षकांना आपली चुकलेली माहिती दुरुस्त करावयाची आहे, किंवा बदली, समायोजन वा इतर कारणाने एका शाळेतून कार्यमुक्त होऊन दुसऱ्या शाळेत रुजू झालेले असून त्याची नोंद संबंधित प्रणालीमध्ये करण्यात आलेली नाही, अशा शिक्षकांनी त्यांच्या Login मधून शिक्षणाधिकारी यांना Online Request करावी. शिक्षणाधिकारी Login मधून Approve/ Verify करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

६) सर्व शिक्षकांना स्वत:चे Login उपलब्ध करुन दिले असल्याने यापुढे बदलीसाठी स्वत:चा अर्ज भरणे अथवा कोणत्याही महत्वाच्या माहितीमध्ये दुरुस्ती करणे यासाठी मुख्याध्यापक Login चा वापर करण्याची आवश्यकता नाही.

७) शिक्षकांना Login करताना Staff ID आवश्यक असल्याने शाळेच्या मुख्याध्यापकाने आपल्या Login च्या माध्यमातून शाळेतील सर्व शिक्षकांना त्यांचा Staff ID उपलब्ध करुन देण्यासाठी आपल्या स्तरावरुन सुचना द्यावी.

८) या वर्षापासून सर्व शिक्षकांना ट्रान्सफर प्रणालीमध्ये स्वत:चे Login उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. त्यामुळे शिक्षकांना फॉर्म भरण्याची सुविधा मुख्याध्यापक Login मधून काढून टाकण्यात आलेली आहे. यापुढे आंतरजिल्हा बदलीचे अर्ज शिक्षकांनी मुख्याध्यापक Login ला न भरता स्वत:च्या Login मध्ये भरावेत. शिक्षकांनी आपला अर्ज भरण्यासाठी Login ID म्हणून सरल प्रणालीमध्ये असलेला स्वत:चा **Staff ID** व पासवर्ड म्हणून संगणकीय प्रणालीव्दारे सेट केलेला Default Password-जसे की, **Guest123!@#** असा नोंदवावा. यासाठी शिक्षकांच्या मोबाईल नंबरवर आलेल्या OTP च्या सहाय्याने नवीन पासवर्ड तयार करावा. यानंतरच शिक्षकांना आंतरजिल्हा बदलीचा अर्ज भरता येईल.

वरील मुद्यांपैकी जे मुद्दे प्राथमिक शिक्षकांशी संबंधित आहेत. ते मुद्दे आजच संबंधित शिक्षकांच्या निदर्शनास आणण्यात यावेत, ही विनंती.

आपला,

(प्रि.शं.कांबळे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) संचालक, एन.आय.सी.,पुणे.
२) राज्य समन्वयक, ग्रामविकास विभाग, एन.आय.सी.,पुणे.
यांना वरील सूचनेस अनुसरुन माहिती व आवश्यक कार्यवाहीसाठी सादर अग्रेषित.

C:\Users\ajay.sakhare\Desktop\आस्था-14\प्र.क्र.717-2019.docx